चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
२६ जानेवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २५/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, भद्रावती, चिमुर, नागभिड, तळोधी, मुल, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१२** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०५** आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **१,५३,९००/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————

# चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

## १)पोलीस स्टेशन माजरी :—

दिनांक **२५/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **माजरी** अंतर्गत माजरी कॉलरी येथे ०६ आरोपी ईसम हे सटट्रापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **माजरी** येथे अप. क्र. **२०/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **४,९२०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **माजरी** पोलीस करीत आहे.

———————————————————————————————————

## २)पोलीस स्टेशन माजरी :—

दिनांक **२५/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **माजरी** अंतर्गत दफाई माजरी येथे ०१ आरोपी ईसम हा सटट्रापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **माजरी** येथे अप. क्र. **२१/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१६०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **माजरी** पोलीस करीत आहे.

———————————————————————————————————

## ७० वा प्रजासत्ताक दिन पोलीस मुख्यालय येथे संपन्न

- पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना उल्लेखनिय कामगीरीबद्दल प्रशस्तिपत्र.
- पोलीस अधीक्षक कार्यालयात ध्वजारोहण समारंभ संपन्न.
- पोलीस स्टेशन भद्रावती आणि बल्लारशाह यांना आयएसओ नामांकन प्रमाणपत्र
- पोलीस शिपाई प्रकाश मेश्राम यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधितुन १० लक्षचा चेक.

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७० वा वर्धापनदिन समारंभ कार्यक्रम दिनांक २६ जानेवारी २०१९ रोजी पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथे मा.ना.श्री. सुधीर मुनगंटीवार, वित्त नियोजन, वने महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा पालकमंत्री चंद्रपुर जिल्हा यांचे शुभ हस्ते ध्वजारोहण समारंभ संपन्न झाला. त्याचप्रमाणे पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ०८.०० वाजता चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी, यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन पोलीस दलामध्ये ज्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी आपल्या सेवाकालावधीत विशेष आणि उल्लेखनिय कामागीरी बजाविली आहे त्यांना मा. मंत्री महोदय यांचे शुभ हस्ते प्रशस्तिपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. यामध्ये **श्री. दिपक चालुलकर**, पोलीस उपनिरिक्षक, पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर, यांना नक्षलग्रस्त भाग गडचिरोली येथे सेवा दिल्याबद्दल **पोलीस महासंचालकांचे सम्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र** देण्यात आले. तसेच ऑल इंडीया पोलीस क्रिडा स्पर्धेत वुशु गेम फ्रि फायटींग मध्ये सिल्वर मेडल व महाराष्ट्र पोलीस क्रिडा स्पर्धा २०१९ मध्ये गोल्ड मेडल प्राप्त **मपोशि. प्रिती बोरकर**, आणि वेटलिफ्टींग मध्ये ब्रॉझ मेडर प्राप्त **मपोशि वैशाली पाटील** यांना सुध्दा मा. मंत्री महोदय यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले. तसेच आयएसओ नामांकन प्राप्त पोलीस स्टेशन भद्रावती आणि बल्लारशाह यांचे प्रभारी अधिकारी यांना आयएसओ नामांकन प्रमाणपत्र यावेळी प्रदान करण्यात आले.

त्याचप्रमाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, शोध व बचाव विभाग यांच्या साहासीपुर्ण कामगीरीने वरोरा तालुक्यातील पोथरा नदीच्या पुरातुन आणि छोटा नागपुर–विचोडा येथील नाल्याच्या पुरात अडकेलेल्या एकुण १५ नागरीकांना बोटीच्या साहय्याने नदीतुन सुखरूप बाहेर काढुन १५ नागरीकांचा जिव वाचविल्याबद्दल चंद्रपुर पोलीस दलातील **१) पोहवा अशोक गर्गेलवार, २) नापोशि मंगेश मत्ते, ३) पोशि**

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

**गिरीश मरापे, ४) पोशि. उमेश वनकर, ५) पोशि दिलीप चौहान, ६) नापोशि वामन मेश्राम, ७) पोशि. संदिप चाफले, ८) पोशि. अजित कुभमवार, ९) पोशि. प्रफुल केमेकर, १०) पोशि. मनोज हांडे** यांचा मा. मंत्री महोदय यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देवुन सत्कार करण्यात आला.

दिनांक २०/०१/२०१९ रोजी पोलीस शिपाई प्रकाश मेश्राम हे आपले कर्तव्य बजावित असतांना त्यांना आपला जिव गमवावा लागला. त्यांच्या पश्चात कुटुंबीयांना आर्थिक मदत म्हणुन मा. मुख्यमंत्री यांचे सहायता निधीतुन १० लक्ष रूपयाचा चेक त्यांचे आई–वडील व पत्नी यांना मा. मंत्री महोदय यांचे हस्ते सुपूर्द करण्यात आला.

प्रजासत्ताक दिनाच्या या सोहळयाकरीता मा. ना. श्री. हंसराज अहिर, केंद्रीय गृहराज्यमंत्री, भारत सरकार, मा.ना.श्री. सुधीर मुनगंटीवार, वित्त नियोजन, वने महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा पालकमंत्री चंद्रपुर जिल्हा, मा. देवराव भोंगळे, जिल्हा परिषद अध्यक्ष, मा. आमदार नानाभाउ शामकुळे, महापौर अंजलीताई घोटेकर, मनपा चंद्रपुर, श्री. कुणाल खेमणार जिल्हाधिकारी, चंद्रपुर, श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, श्री. जितेंद्र पापळकर, मुख्यकार्यपालन अधिकारी जि.प. चंद्रपुर, श्री. हेमराजसिंह राजपूत अपर पोलीस अधीक्षक, परेड कमांडर श्री. नवनित कांवत, परिविक्षाधिन आयपीएस अधिकारी, श्री. सुशिलकुमार नायक, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर यांचेसह पोलीस अधिकारी, कर्मचारी, मोठया संख्येने शालेय विद्यार्थी, स्वातंत्र्य सेनानी, प्रतिष्ठत नागरीक, इलेक्ट्रनिक आणि प्रिंट मिडीयाचे प्रतिनिधी यांची उपस्थित होती.

---

# ‘पोलीस सारथी’ आम्ही घेतो महिला व मुलींची काळजी

## मंत्री महोदयांच्या हस्ते योजनेचा शुभारंभ

पोलीस दलावर समाजातील प्रत्येक घटकाची सुरक्षिततेची जबाबदारी असल्याची जाणीव होत असतांना महिला व मुली यांची सुरक्षा करणे हे सुध्दा पोलीस दलाचे मुख्य व आद्य कर्तव्य असल्याचे अधोरेखीत आहे. महिलांच्या सुरक्षिततेकरीता मुख्यत: महिला व मुली यांना रात्री अपरात्री घरी जाण्याकरीता किंवा काही मदत पाहिजे असल्यास, पोलीस दलाकडुन तात्काळ मदत मिळावी या दृष्टीने प्रजासत्ताक दिनाचे औचीत्य साधुन मा.ना.श्री. सुधीर मुनगंटीवार, वित्त नियोजन, वने महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा पालकमंत्री चंद्रपुर जिल्हा यांचे उपस्थितीत, **‘पोलीस सारथी’** (आम्ही घेतो महिला व मुलींची काळजी) या योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

पोलीस सारथी या मागील मुख्य संकल्पना ही आहे की, आम्ही घेतो महिला व मुलींची काळजी, रात्री १० वा. ते सकाळी ५ वाजेपर्यंत संकटात सापडलेले महिला व मुलींना मदत पाहिजे असल्यास किंवा घरी जाण्यासाठी पोलीस नियत्रंण कक्ष संपर्क क्रमांक **07172-251200, 263100, 273258,** महिला हेल्पलाईन **1091** व्हॉट्सॲप क्रमांक **9404872100** यावर संपर्क करावा. त्यांना त्यांच्या घरी सोडण्यात येईल, असे पोलीस सारथी या योजनेचा मुख्य उद्देश आहे. मा. मंत्री महोदय यांनी पोलीस मुख्यालय मैदानावरील मोठया संख्येने उपस्थित महिला व नागरीक यांच्या उपस्थितीत या योजनेची घोषणाकरताच उपस्थित महिलां व मुली यांनी उत्साहात व टाळयांच्या आवाजात या योजनेचे स्वागत केले. पोलीस सारथी या योजनेबाबत महिला व मुली यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना समाधान व सुरक्षिततेची भावना व्यक्त केली.

या योजनेचा उपयोग ज्यांना खरोखरच नितांत गरज आहे त्यांनी निसंकोचपणे कोणतीही भिती न बाळगता पोलीसांना संपर्क करावा. पोलीसांवरील असलेला कामाचा ताण पाहता या योजनेचा गैरवापर होणार नाही याची कृपया दक्षता घेवुन चंद्रपुर पोलीसांना सहकार्य करावे.

---